# माहितीचा अधिकारी कायदा २००५ नुसार विद्यार्थी कल्याण विभागात माहितीच्या अधिकाराखाली केलेल्या अर्जदारांना माहिती पुरवण्यात आली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
## विद्यार्थी कल्याण विभाग

- **विद्यार्थी कल्याण विभागातील कार्याची सूची :**

०१. विद्यापीठ विभाग विद्यार्थी संसद निवडणूक- जुलै ते सप्टेंबर

०२. विद्यापीठ विद्यार्थी संसद निवडणूक- जुलै ते ऑक्टोबर

०३. इंद्रधनुष्य व पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सवासाठी विद्यापीठ संघाची निवड चाचणी

०४. इंद्रधनुष्य युवक महोत्सवात विद्यापीठ संघाचा सहभाग

०५. पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सवात विद्यापीठ संघाचा सहभाग.

०६. केंद्रीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव

०७. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील व विद्यापीठ विभागातील विद्यार्थ्यांना निरनिराळ्या ठिकाणी होणाऱ्या स्पर्धा, शिबीर, कार्यशाळा इ. ठिकाणी विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून पाठविण्याची व्यवस्था विभागामार्फत होते.

०८. विद्यार्थी कल्याण विभागांतर्गत खालील व्याख्यानमाला राबवल्या जातात.

  ०१. स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमाला

  ०२. महात्मा गांधी व्याख्यानमाला

  ०३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला

  ०४. राजर्षी शाहू महाराज व्याख्यानमाला

  ०५. डॉ. सी. व्ही. रामण व्याख्यानमाला

  ०६. डॉ. जगदीशचंद्र बोस व्याख्यानमाला

  ०७. डॉ. मोईन शाकीर व्याख्यानमाला

  ०८. डॉ. अनंत व लता लाभसेटवार व्याख्यानमाला

०९. विद्यार्थी कल्याण विभागातर्फे खालील शिबीरे व कार्यशाळा राबवल्या जातात.

  ०१. नवोदित लेखकांसाठी कार्यक्रम

  ०२. नाटय प्रशिक्षण शिबिर

  ०३. पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण

  ०४. व्यसनमुक्ती महाविद्यालयीन स्पर्धा

  ०५. उद्योजकता विकास कार्यशाळा

  ०६. युवक नेतृत्व शिबिर (विद्यार्थी संसदेच्या सचिवांकरिता)

  ०७. विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास शिबिर (अ)

  ०८. विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास शिबिर (ब)

१०. विद्यार्थी कल्याण विभागातर्फे राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा दरवर्षी आयोजित केली जाते.

११. विद्यार्थी कल्याण विभागांतर्गत महंत भास्करबाबा नागराजबाबा महानुभाव आश्रम व विद्यापीठातर्फे महंत भास्करबाबा नागराजबाबा महानुभाव वक्तृत्व व निबंध स्पर्धा महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठस्तरावरील विद्यार्थ्यांसाठी राबविली जाते.

- **उपहारगृहे व चहास्टॉल :**

विद्यार्थी कल्याण विभागाअंतर्गत खालील ठिकाणी उपहारगृहे व चहास्टॉल आहेत.

१) प्रशासकीय इमारतीसमोर विद्यापीठ उपहारगृह

२) जुन्या संगणकशास्त्र विभागाजवळ उपहारगृह

३) परीक्षा भवन जवळ चहास्टॉल

४) पदार्थ विज्ञान विभागाजवळ चहास्टॉल

५) सामाजिकशास्त्रे इमारतीच्या मागील बाजूस

- **वसतिगृह :**

०१. विद्यार्थी / विद्यार्थिनी वसतिगृहात विभागातील प्रवेशित विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश दिला जातो- जुलै ते ऑगस्ट

०२. प्रियदर्शिनी विद्यार्थिनी वसतिगृहात ५०% टक्के जागा विद्यापीठातील विद्यार्थिनींकरिता आरक्षित व ५०% टक्के जागा शासनामार्फत भरल्या जातात.

०३. विद्यापीठ परिसरात पदव्युत्तर मुलांचे वसतिगृह एकूण पाच व एक विद्यार्थी विश्रामगृह आहे. त्यापैकी तीन वसतिगृहात खानावळ आहे.

०४. विद्यार्थिनी वसतिगृह तीन असून एक शासकीय प्रियदर्शिनी विद्यार्थिनी वसतिगृह असे एकूण चार विद्यार्थिनी वसतिगृहे आहेत. त्यापैकी दोन वसतिगृहामध्ये खानावळ आहे.

- **स्व.वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजना (कमवा व शिका योजना) :**

०१. कमवा व शिका योजनेत विद्यार्थ्यांना प्रत्येक विभागामार्फत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कमवा व शिका योजनेत प्रवेश दिला जातो. एकूण ४०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो.

०२. कमवा व शिका योजनेअंतर्गत आंबा फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. या फळझाडांच्या फळांचा जाहीर लिलाव करण्यात येतो.

०३. कमवा व शिका योजनेअंतर्गत २ एस.टी.डी. व ८ पी.सी.ओ. आहेत.

**एस.टी.डी. :** विद्यार्थिनी वसतिगृह परिसर येथे एक एस.टी.डी. व नारळीबाग येथे एक एस.टी.डी. केंद्र आहे.

**पी.सी.ओ. :**

०१. विद्यार्थिनी वसतिगृह परिसरात दोन (०२),

०२. नारळीबाग दोन (०२),

०३. विज्ञान विभाग कॅन्टीन एक (०१),

०४. मेन कॅन्टीन एक (०१),
०५. प्रशासकीय इमारतीसमोर प्रकाशन केंद्र येथे एक (०१) व
०६. वाणिज्य विभाग एक (०१)

०४. **झेरॉक्स केंद्र :-**

वाणिज्य विभागासमोर एक झेरॉक्स मशीन आहे.
प्रशासकीय इमारतीसमोर एक झेरॉक्स मशीन आहे.
विद्यार्थी कल्याण विभागात एक झेरॉक्स मशीन आहे.

०५. **शेती :**

०१. नारळीबाग विद्यार्थी वसतिगृह क्र. १ च्या पाठीमागे :- नारळ, आंबा, जांभुळ, चिकू इ., एक विहीर, विद्युत मोटार ५ एच.पी.-१, गांडुळ खत प्रकल्प इ.
०२. परीक्षा विभागाच्या पाठीमागे :- ३५० आंब्याची रोपे, विहीर एक, विद्युत मोटार ५ एच.पी.
०३. सामाजिकशास्त्र विभागाच्या पाठीमागे :- मोठी आंब्याची झाडे ९५, जांभुळ २०, विद्युत मोटार ५ एच.पी., एक विहीर
०४. अतिथीगृहा समोर :- आवळा ५० रोपे व चिंच ५० रोपे
०५. मा. कुलगुरु निवास :- सागवान रोपे ९१०
०६. सिट्रोनिला गवत
०७. रोजगाव व स्वयंरोजगार उपक्रम २००४-०५ पासून राबवला जात आहे. मराठवाडा विभागाच्या ८ जिल्हयातील विद्यार्थ्यांकरिता मर्यादित.

- **कार्यक्रम व समारंभ :**

०१. १४ जानेवारी- विद्यापीठ नामविस्तारदिन साजरा केला जातो. (स्थानिक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या भिमगीत स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.)
०२. २६ जानेवारी- प्रजासत्ताकदिन म्हणून साजरा केला जातो.
०३. १९ फेब्रुवारी- शिवजयंती साजरी केली जाते. त्यामध्ये शिवाजी महाराज अध्यासन केंद्र व विद्यापीठ प्रशासन सहभागी होवून साजरी करतात.
०४. १४ एप्रिल- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र व विद्यापीठ प्रशासनामार्फत विविध कार्यक्रमांनी साजरी केली जाते.
०५. १ मे- महाराष्ट्र दिन साजरा करण्यात येतो.

०६. वर्षातून दोन वेळा विद्यापीठ सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा सेवागौरव आयोजित करण्यात येतो.

०७. १५ ऑगस्ट- हा भारतीय स्वातंत्र्याचा दिवस साजरा करण्यात येतो.

०८. २३ ऑगस्ट- हा विद्यापीठाचा वर्धापनदिन असून तो वर्धापन दिन साजरा करण्यात येतो.

०९. १७ सप्टेंबर- मराठवाडा मुक्तिसंग्रामदिन म्हणून साजरा करण्यात येतो.

१०. २ ऑक्टोबर- गांधी जयंती साजरी करण्यात येते.

११. ६ डिसेंबर- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त समता शांती पदयात्रा काढण्यात येते व मान्यवर व्यक्तींचे व्याख्यान आयोजित करण्यात येते.

१२. विद्यापीठातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वैद्यकीय व पुस्तक खरेदी करण्यासाठी आर्थिक मदत केली जाते.

१३. विविध नेत्यांच्या पुण्यतिथ्या व जयंत्या साजऱ्या करण्यात येतात. (शासकीय नियमाप्रमाणे)

- **विद्यार्थी कल्याण विभागाची रचना :-**

एक) **संचालक, विद्यार्थी कल्याण मुख्य अधिकारी**

| | |
|---|---|
| कार्यक्रम संयोजक- | विद्यापीठातील कार्यक्रमाचे नियोजन व देखरेख |
| सहायक अधीक्षक- | कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर देखरेख व मार्गदर्शन |
| वरिष्ठ सहायक- | पत्रव्यवहार व सर्व कार्यालयीन पत्रव्यवहार |
| वरिष्ठ सहायक- | पत्रव्यवहार व सर्व कार्यालयीन पत्रव्यवहार |
| कनिष्ठ सहायक- | वरिष्ठाच्या कार्यासाठी मदत व पत्रव्यवहार |
| कनिष्ठ सहायक- | वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे पत्रव्यवहार व समस्यासाठी मदत |
| शिपाई- | कार्यालयीन कामाच्या मदतीसाठी |

दोन) विद्यापीठ कायद्यानुसार व स्टँटर्ड कोड व्यवस्थापन परिषदेने व अधिसभेने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे कार्यालयीन काम कार्यालयाचे संचालक यांच्या मार्ग्दर्शनाखाली व विचारविनिमयाने विभागातील कार्यालयाचा कारभार चालविण्यात येतो.

तीन ) संचालक, विद्यार्थी कल्याण हे कार्यालयामधील सर्व कर्मचाऱ्याशी विचारविनिमय करुन व विद्यापीठ कायद्याच्या चौकटीत राहून निर्णय घेतात.

चार) विद्यापीठाच्या अधिकारमंडळाने ठरवून दिलेल्या अधिनियमाप्रमाणे व मा. कुलगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयामधील निर्णय घेण्यात येतात.

पाच) विद्यापीठ कायद्यानुसार व स्टँटर्ड कोड व शासनाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे तसेच व्यवस्थापन परिषद व अधिसभेने तसेच मा. कुलगुरुंनी मार्गदर्शित केलेल्या नियमानुसार निर्णय घेण्यात येतात.

सहा) केंद्रीय युवक महोत्सवातील सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र विद्यापीठामार्फत वितरीत करण्यात येतात. तसेच इंद्रधनुष्य, पश्चिम विभागीय आतरविद्यापीठीय युवक महोत्सव यांनी पाठवलेले प्रमाणपत्र सदरील विद्यार्थ्यांना विभागामार्फत वितरीत करण्यात येते.

सात) विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे व मा. कुलगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी कल्याण विभागातील निर्णय घेण्यात येतात.

आठ) विद्यार्थी संसद निवडणूक पार पाडण्यासाठी विद्यापीठातील तज्ज्ञ प्राध्यापक व व्यवस्थापन परिषद सदस्यांची एक समिती नियुक्त करण्यात येते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली व विद्यापीठ कायद्याच्या नियमावलीनुसार विद्यापीठातील निवडणुका पार पडतात.

अ) केंद्रीय युवक महोत्सव व्यवस्थितशीर पार पाडण्यासाठी विद्यापीठातर्फे तज्ज्ञ व्यक्तींची व व्यवस्थापन परिषद सदस्यांची समिती गठीत करुन त्यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय युवक महोत्सवाचे व्यवस्थापन करण्यात येते.

ब) विद्यापीठातील कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांची निवड करतेवेळीस विभागप्रमुखांनी निवड केलेल्या विद्यार्थ्यांची निवड व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांची समिती गठीत करुन कमवा व शिकाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो.

क) विद्यापीठ कार्यक्रम ठरवण्यासाठी विद्यापीठातील नामवंत प्राध्यापकांची समिती नियुक्त करुन त्यांच्या मार्गदर्शनाखाली नामवंत व्यक्ती त्या-त्या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात येतात.

नऊ) विद्यार्थी कल्याण विभागातील कर्मचारी व संचालक यांच्या विचारविनिमयाने मा. कुलगुरुंच्या मार्गदर्शनाखाली विभागातील निर्णय घेण्यात येतात.

दहा) विद्यापीठ अधिकारी व कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनामार्फत वेतन देण्यात येते.

अकरा) विद्यापीठाच्या आर्थिक तरतुदीनुसार विद्यार्थी कल्याण विभागामध्ये खालीलप्रमाणे आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| १) विद्यार्थी संसद कार्यक्रम- | ३०,०००/- |
| २) आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव- | ८,००,०००/- |
| ३) इंद्रधनुष्य, पश्चिम विभागीय व राष्ट्रीय युवक महोत्सव- | ५,००,०००/- |
| ४) विविध व्याख्यानमाला- | ७०,०००/- |
| ५) विविध कार्यशाळा व शिबिरे- | १,२०,०००/- |
| ६) स्व. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजना- | ३०,००,०००/- |
| ७) विद्यापीठ कार्यक्रम व समारंभ- | २,७५,०००/- |
| ८) सेवागौरव- | ७५,०००/- |

बारा) स्व. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजनेअंतर्गत पदव्युत्तर विद्यार्थ्यांस प्रत्येकी ७२०/- रुपये प्रतिमाह आणि एम.फील. / पीएच.डी. विद्यार्थ्यांसाठी प्रतिमाह १०००/- रुपये देण्यात येतात.

तेरा) विद्यार्थी कल्याण विभागातून परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिली जात नाही.

चौदा) विद्यार्थी कल्याण विभागात कार्यालयीन कामासाठी संगणक उपलब्ध आहे.

पंधरा) माहिती मिळवण्यासाठी लोकांना संगणकाद्वारे पत्र देण्याची व्यवस्था आहे. तसेच विभागामध्ये कमवा आणि शिका अंतर्गत झेरॉक्स मशीन स्वस्त दरामध्ये उपलब्ध आहे. विभागामध्ये ग्रंथालय उपलब्ध नाही.

सोळा) विद्यापीठाने विद्यार्थी कल्याण विभागाकरिता संचालक, विद्यार्थी कल्याण प्रा. व्ही. एल. सिरसट यांची नियुक्ती केली आहे.

सतरा) विभागातर्फे कोणत्याही प्रकारची माहिती पुस्तिका अथवा अहवाल तयार करण्यात येत नाही.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**
**विद्यार्थी कल्याण विभाग**

श्री. श्रीरंग वारे, मेहराज हॉटेल, जयसिंगपुरा, औरंगाबाद यांच्या दि. १६.०९.२००६ च्या अपीलासंदर्भात अपिलीय अधिकाऱ्यांच्या समक्ष सुनावणी दि. १८.०६.२००७ रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता होवून श्री. श्रीरंग वारे यांनी अपिलासंदर्भात पुढील तारीख मागून घेतली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**
**विद्यार्थी कल्याण विभाग**

संविक / मा.अ. / २००७ / १६.०३.२००७

प्रति,

**श्री. लक्ष्मण तानका देवरे**

अध्यक्ष, महात्मा ज्योतिबा फुले सेवा मंडळ,

८५, नवीपेठ, जळगाव - ४२५ ००१.

विषय : **महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे शासनाने प्रसिध्द केलेले फोटो कार्यालयात लावणे बाबत...**

संदर्भ : ०१) आपले पत्र दि. १९.०२.२००७

०२) आपले अपील दि. ०४.०३.२००७

**महोदय,**

सदर्भिय पत्र व अपीलाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, :-

०१) आपणास पत्र क्र. आस्था / २००७ / १६३१८-१९, दि. २५.०१.२००७ अन्वये वस्तूनिष्ठ माहिती कळविण्यात आली आहे.

०२) विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांमध्ये माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी उपलब्ध असून महाविद्यालयांचे प्रशासन स्वतंत्र असल्यामुळे जी माहिती विद्यापीठाशी संबंधित नाही अशी त्या-त्या महाविद्यालयासंबंधीची माहिती तेथील माहिती अधिकारी पुरवितात.

तथापि, आपल्या माहिती अधिकार अधिनियमातील दि. ०२.०१.२००७ च्या अर्जाची प्रत आपण सादर केलेल्या शासन निर्णयाच्या प्रतीसह सर्व संलग्नित महाविद्यालयांना दि. १२.०३.२००७ रोजी पाठविण्यात आलेली असून त्यांचेकडून आवश्यक माहिती मागविण्यात आलेली आहे. (या पत्राची प्रत सोबत जोडली आहे)

०३) माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने या कार्यालयातील सर्व माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी जबाबदारीने माहिती पुरवित असून आजतागायत ९५० पेक्षा जास्त व्यक्तींना वस्तूनिष्ठ माहिती पुरविण्यात आली आहे.

०४) दि. ०१.०२.२००७ रोजी संदर्भ क्र. संविक/२००७/१०१४१ च्या पत्राने ४० X ५० सें.मी. आकाराचे फोटो त्यांच्याकडे उपलब्ध आहे किंवा कसे या संबंधी चौकशी

करण्याकरिता शासकीय मुद्रणालयाला विनंती करण्यात आली होती. (या पत्राची छायांकित प्रत जोडली आहे)

०५) सहायक संचालक, शासकीय लेखण सामुग्री व ग्रंथगार, औरंगाबाद यांचे पत्र क्र. ग्रंथगार / ३७४८, दि. २७.०२.२००७, दि. ०९.०३.२००७ रोजी या कार्यालयास प्राप्त झाले असून त्याची सत्यप्रत सोबत जोडण्यात येत आहे. त्यांच्याकडून फोटोच्या आवश्यक प्रती मिळविण्याकरिता तात्काळ कार्यालयीन कार्यवाही करण्यात येत आहे. (या पत्राची छायांकित प्रत जोडली आहे)

याउपर, याप्रकरणी आपणास अद्याप काही म्हणने प्रत्यक्ष सादर करुन आपली समस्या मांडावयाची असल्यास या प्रकरणी दि. ३०.०३.२००७ रोजी दु. ३.०० वाजता कुलसचिवांच्या कक्षात सुनावणी ठेवण्यात येईल. आपली इच्छा असल्यास तसे तात्काळ कळवावे, ही विनंती

आपला विश्वासू,

**(डॉ. गजानन सुरासे)**
कुलसचिव

या पत्राची एक प्रत माहिती अधिकारी, आस्थापना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**
**विद्यार्थी कल्याण विभाग**

संदर्भ क्र. : संविक / २००७ / दिनांक : ४ जून, २००७

संदर्भ क्र. : आपल्या कार्यालयाचे पत्र क्र. कुसका/माहिती अधिकार/२००७/४९१६-२१, दि. २/४-०६-२००७

आपल्या उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

०१. आपल्या पत्रातील प्रमुख मागण्यांपैकी क्र. ४ च्या मागणीप्रमाणे असे कळविण्यात येते की, सध्या विद्यार्थी संसदेच्या निवडणुका महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार घेण्यात येत आहेत. महाराष्ट्र शासनाचे घविद्यार्थी संसदेच्या निवडणुका लोकशाही पध्दतीनेङ घेण्याबाबतचे आदेश प्राप्त झालेले नाहीत.

०२. क्र. ५ च्या मागणीनुसार असे कळविण्यात येते की, घ्कमवा आणि शिकाङ योजनेतील विद्यार्थी संख्या वाढविण्याबाबत व त्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठ प्रशासनासमोर विचारार्थ ठेवण्यात येईल.

०३. क्र. १६ च्या मागणीनुसार असे कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांच्या तक्रारी आल्यानंतर सदर तक्रारी घविद्यार्थी तक्रार निवारण समितीसमोरङ विचारार्थ ठेवण्यात येतील.

०४. क्र. १७ नुसार विद्यार्थी संसदेच्या निवडणुका न घेणाऱ्या महाविद्यालयांना व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयाप्रमाणे या कार्यालयाचे पत्र क्र संविक/विसंनि/२००६-०७/५५९६-५६२९, दि. ३०.०९.२००६ नुसार दंडात्मक कार्यवाहीबाबत कळविण्यात आले.

आपल्या माहितीस्तव देण्यात येत आहे.

**संचालक,**
विद्यार्थी कल्याण विभाग

प्रति,
**कुलसचिवांचे स्वीय सहायक,**
मा. कुलसचिवांचे कार्यालय,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**
**विद्यार्थी कल्याण विभाग**

संविक / २००७ / १४.११.२००७

प्रति,
**श्री. शेख हबीब पाशा गुलाम रसूल**
घर नं. १ / १६ / ३२, जुना बाजार,
औरंगाबाद.

विषय :**आपला माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत माहिती मागविणे बाबत अर्ज दि. २९-१०-२००७**

**महोदय,**

आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या कमवा आणि शिका योजनेअंतर्गत मागितलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

०१) झेरॉक्स, लॅमिनेशन, फाईल निर्मिती केंद्र, स्क्रीन प्रिंटींग, विद्यापीठ प्रकाशने विक्री केंद्र व एस.टी.डी. / पी.सी.ओ.

०२) कमवा आणि शिका योजनेतील प्रत्येक पदव्युत्तर विद्यार्थ्यास दरमहिना रु. ६००/- आणि एम.फील., पीएच.डी. विद्यार्थ्यांस रु. १०००/- मानधन देण्यात येत होते. प्रत्येक दिवशी दोन तास विविध विभागात व सर्व युनिटवर विद्यार्थी / विद्यार्थिनींना काम देण्यात येते.

दि. २६.१०.२००७ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये कमवा व शिकाच्या विद्यार्थ्यांच्या मानधनात वाढ करण्यात आली.

०३) विद्यार्थी / विद्यार्थिनींना फाईल निर्मिती व स्क्रीन प्रिंटींगचे प्रशिक्षण देण्याकरिता मानधनतत्वावर अनुभवी प्रशिक्षक नेमण्याची तरतूद आहे.

०४) हा खर्च विद्यापीठाच्या कमवा आणि शिका योजनेअंतर्गत असलेल्या आर्थिक तरतुदीमधून करण्यात येतो. अंदाजे खर्च ५,००,०००/- रुपये.

०५) हे सर्व काम विद्यापीठाच्या कमवा आणि शिका योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेले आहे.

१) झेरॉक्स **:-** विद्यार्थ्यांच्या व कार्यालयाच्या सोयीकरिता (३)

२) लॅमिनेशन **:-** विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता (१)

२...

३) फाईल निर्मिती केंद्र **:-** विद्यापीठाला लागणारे फाईल, पॅड, लिफाफे पुरवठा करण्याकरिता (**तांत्रिक बिघाडामुळे सध्या फाईल निर्मिती केंद्र कार्यरत नाही**)

४) स्क्रीन प्रिंटींग **:-** विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याकरिता व कार्यालयीन सोयीकरिता

५) विद्यापीठ प्रकाशने विक्री केंद्र **:-** विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता (जानेवारी २००७ पासून बंद)

६) एस.टी.डी. व पी.सी.ओ.**:-** पीसीओ-६ व एसटीडी- २ विद्यार्थ्याच्या सोयीकरिता

०६) **योजना** : योजनेतील सर्व कामे विद्यापीठात कमवा आणि शिका योजनेअंतर्गत करण्यात पदव्युत्तर, एम.फील., पीएच.डी. परिस्थितीत कार्यरत असून यामध्ये एकूण ४५० विद्यार्थी / विद्यार्थिनी याचा लाभ घेत आहेत. (तांत्रिक अडचणीमुळे स्क्रीन प्रिंटींग, फाईल निर्मिती केंद्र, विद्यापीठ प्रकाशने विक्री केंद्र व मत्स्य व्यवसाय बंद आहे.)

आपला विश्वासू,

**माहिती अधिकारी**
विद्यार्थी कल्याण विभाग

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**
**विद्यार्थी कल्याण विभाग**

श्री. संजय गोपिनाथ भिंगारे, रा. बेगमपुरा, औरंगाबाद यांनी विद्यापीठात रोजंदारीवर काम केलेल्या हजेरीची माहिती मिळण्यासाठी केलेला अर्ज.

१९८६ ते १९८८ पर्यंत मागितलेली माहिती ०१.०४.१९८७ ते १९८८ पर्यंत काम केलेल्या हजेरीची माहिती झेरॉक्स करुन देण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
विद्यार्थी कल्याण विभाग
कमवा व शिका

०१. एस.टी.डी. / पी.सी.ओ., झेरॉक्स, गांडूळ खत, विद्यार्थ्यांच्या सेवेकरिता उपलब्ध तसेच त्यांना प्रशिक्षण देण्याकरिता

०२. विद्यार्थी प्रशिक्षण घेवून गेल्यानंतर स्वतःचे स्वावलंबी जीवन जगण्यासाठी या योजनेचा उपयोग होतो.

विद्यार्थ्यांची निवड ही विभागप्रमुख आपआपल्या विभागात करतात यात प्रथम वर्षाचे पाच व द्वितीय वर्षाचे पाच विद्यार्थ्यांची निवड करुन अंतिम यादी कमवा आणि शिका योजनेस पाठवली जाते.

०३. प्रत्येक ठिकाणी कंत्राटी तांत्रिक विभागात अनुभवी व्यक्तींच कंत्राटी पध्दतीने विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. .

०४. कमवा आणि शिका योजनेला येणारा खर्च विद्यापीठ निधीतून करण्यात येतो. आणि आर्थिक तरतूद २०,००,००० लाख असून १३ लाख या योजनेवर खर्च येतो.

०५. विद्यापीठाच्या कमवा आणि शिका योजनेअंतर्गत विद्यापीठ निधीतून योजनेच्या विद्यार्थी व विविध प्रकारचे राबविण्यात येणारे योजनेकरिता कुठल्याही प्रकारचा ग्रँट मिळालेला नाही.

०५. सध्या विद्यापीठ परिसर स्वच्छतेची कामे व विविध विभागामध्ये व कार्यालयीन कामात तसेच लावलेल्या रोपांना पाणी, आळे, दांड वाफे, गादी वाफे, कुंडयास पाणी, तसेच एस.टी.डी. / पी.सी.ओ., झेरॉक्स चालवणे अशी वेगवेगळ्या प्रकारची कामे करुन घेतली जात आहेत.

२...

- १० एकर जमिनीअंतर्गत फळबाग (शेती) आहे. त्याचा होणारा खर्च कमवा आणि शिका योजनेच्या विद्यापीठ निधीतून केला जातो. प्रत्येक वर्षाचा खर्च हा त्या वर्षीच्या विद्यार्थी संख्येवर अवलंबून असतो. ही योजना गरिब, होतकरु व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांकरिता असून ना नफा ना तोटा या तत्वावर चालत आहे. या योजनेकडे आजपर्यंत कुठल्याही प्रकारचे प्रकल्प नसल्याने फक्त विद्यार्थ्यांवरच खर्च होत होता. गेल्या सात-आठ वर्षापासून या योजनेअंतर्गत भाजीपाला व फळझाडे या ठिकाणी विद्यार्थी काम करतात. त्या वेळेपासून थोडेफार उत्पन्नास सुरुवात झाली आहे. साधारणतः आजपर्यंत भाजीपाला, फळे यातून अंदाजे २,४८,९०६ रुपये उत्पन्न मिळाले.

- विद्यापीठात फळबाग / शेती १९८०-८१ पासून सुरु झाली.
- चार एकर जमीनीत फळबाग आहे. तीन एकर पडीक जमीन आहे.
- फळबाग शेतीवर कंत्राटी मजूर रात्री एक आणि दिवसा एक प्रतिदिन ४५ रुपये प्रमाणे ३२८५०/- रुपये वार्षिक खर्च होतो.
- विद्यापीठ निधीतून सदरील खर्च करण्यात येतो.
- प्रत्येक वर्षाला ३२५८०/- खर्च रुपये येतो.
- प्रत्येक वर्षाला मिळालेले उत्पन्न

| | | |
|---|---|---|
| | २०००-०१ | ७६०००/- |
| | २००१-०२ | १६०००/- |
| | २००२-०३ | १८०००/- |
| | २००३-०४ | ५०३००/- |
| | २००४-०५ | ३८५००/- |
| | २००५-०६ | ७२५००/- |
| भाजीपाला - | २००६-०७ | ६७६०६/- |

- वरील दर्शविल्याप्रमाणे त्या वर्षापासून उत्पन्नास सुरुवात झाली. कमवा आणि शिका ही योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालत आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
## कमवा आणि शिका योजना
## माहितीचा अधिकाराबाबतची माहिती

०१. विद्यापीठामध्ये कमवा आणि शिका योजनेअंतर्गत एस.टी.डी. / पी.सी.ओ., झेरॉक्स विद्यार्थ्यांच्या सेवेकरिता तसेच त्यांना प्रशिक्षण देण्याकरिता मदत होते.

०२. विद्यार्थी प्रशिक्षण घेवून गेल्यानंतर स्वत:च्या गावी स्वत:चे स्वावलंबी जीवन जगता यावे, यासाठी विद्यापीठात कमवा आणि शिका योजनेअंतर्गत घेतलेले प्रशिक्षण उपयोगी पडते.

विद्यार्थ्यांची निवड ही विभागप्रमुख आपआपल्या विभागात विद्यार्थ्यांची मुलाखत घेवून प्रथम वर्षाचे पाच आणि द्वितीय वर्षाचे पाच असे एकूण दहा विद्यार्थ्यांची निवड करुन अंतिम यादी व प्रवर्गाप्रमाणे कमवा आणि शिका योजनेकडे पाठविली जाते

| प्रवर्ग | पदव्युत्तर विद्यार्थी | | एम. फील. / पीएच. डी. विद्यार्थी | |
|---|---|---|---|---|
| | २००५-०६ | २००६-०७ | २००५-०६ | २००६-०७ |
| एस. सी. | ५३ | ७४ | २६ | २३ |
| एस. टी. | ०६ | ०६ | ०२ | ०० |
| एन. टी. | २० | २३ | १२ | १८ |
| ओ.बी.सी. | ०६ | १५ | ११ | ११ |
| खुला | २१ | ३३ | २३ | १५ |
| अपंग | ०१ | ०२ | ०१ | ०१ |
| एस.बी.सी. | ०१ | ०२ | ०० | ०० |
| **एकूण** | **१०८** | **१५५** | **७५** | **६८** |

**एकूण ४०५ विद्यार्थी**

०३. वेगवेगळ्या ठिकाणी कंत्राटी तांत्रिक (मजूर) अनुभवी व्यक्तीकडून विद्यार्थ्यांना दोन तास प्रशिक्षण दिले जाते.

०४. कमवा आणि शिका योजनेवर होणारा खर्च विद्यापीठ निधीतून करण्यात येतो. वर्ष २००५-०६ पर्यंत विद्यार्थ्यांवर झालेला खर्च ८,८१,३८४/- रुपये. २००६-०७ पर्यंत विद्यार्थ्यांवर झालेला खर्च १२,४२,८४३/- रुपये.

०५. विद्यापीठ निधीतून चालवण्यात येणाऱ्या कमवा आणि शिका योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांवर विविध प्रकारच्या उपक्रमातून विद्यापीठ निधीतूनच खर्च केला जातो. तसेच कमवा आणि शिका योजनेकरिता कुठल्याही प्रकारचे महाराष्ट्र शासनाकडून अनुदान २००५-०७ मध्ये मिळालेले नाही.

०६. विद्यापीठ अंतर्गत चालवण्यात येणाऱ्या कमवा आणि शिका योजनेच्या विद्यार्थ्याकडून विविध प्रकारची वेगवेगळ्या ठिकाणी कामे करुन घेतली जात आहेत. ती अशी-

विद्यापीठ परिसर स्वच्छ ठेवणे, तसेच सध्या चालू असलेल्या उपक्रमावर विद्यार्थी ठेवून कामे करुन घेतली जातात. या योजनेत असलेल्या जमिनीत फळझाडे रोपांची लागवड करुन त्याकरिता खड्डे खोदणे, आळे, दांड, वाफे, गादी वाफे या सर्वांना पाणी देणे व योजनेअंतर्गत असलेल्या नर्सरीतील रोपांना व कुंडयांना पाणी देणे, एस.टी.डी. /पी.सी.ओ., झेरॉक्स चालवणे आणि विविध विभागात दोन तास कार्यालयीन कामात मदत करणे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
## कमवा आणि शिका योजना

०१. कमवा आणि शिका योजनेअंतर्गत वर्ष १९८९ या आर्थिक वर्षापासून फळबाग व भाजीपाला राबविण्यात येतो.

०२. कमवा आणि शिका योजनेअंतर्गत फळबाग साधारणत: चार एकर व शेती तीन एकर आहे.

०३. कमवा आणि शिका योजनेच्या अंतर्गत फळबाग व शेतीवर झालेला खर्च, बजेट हेड व उत्पन्नाचा वर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | खर्च रुपये | कोणत्या बजेटहेड मधून खर्च करण्यात आला | उत्पन्न | शेरा |
|---|---|---|---|---|
| १९७९-८० | ७६२३ | कमवा आणि शिका योजना | | या योजनेअंतर्गत येणारे उत्पन्न हे विद्यापीठा-वर होणाऱ्या खर्चाला हातभार लावण्या-साठी वापरण्यात येते. |
| १९८०-८१ | १२२२० | | | |
| १९८१-८२ | ११२२० | | | |
| १९८२-८३ | १३४८० | | | |
| १९८३-८४ | १०५२० | | | |
| १९८४-८५ | १२१५० | | | |
| १९८५-८६ | १४१२० | | | |
| १९८६-८७ | १५६८० | | | |
| १९८७-८८ | १४८९० | | | |
| १९८८-८९ | ६१६४८ | | | |
| १९८९-९० | ७४८६० | | ५१७ | |
| १९९०-९१ | ९९३९४ | | ७६११ | |
| १९९१-९२ | ६००७० | | ६४६४ | |
| १९९२-९३ | ९१५०२ | | ३००९ | |
| १९९३-९४ | ३६८४५ | | १७९१ | |
| १९९४-९५ | १४७०९४ | | ५४४२ | |
| १९९५-९६ | ७७८८० | | ७१७५ | |
| १९९६-९७ | ७९३०२ | | ६३ | |
| १९९७-९८ | ६३९७० | | ११७४८ | |
| १९९८-९९ | ४४७९८८ | | १७७४९ | |
| १९९९-२००० | २६१४१६ | | २६५९२ | |
| २०००-०१ | ३२८५५० | | १५३६५ | |
| २००१-०१ | ४९४०४३ | | ७९७९२ | |
| २००२-०३ | ७००४३९ | | ३०२८७ | |
| २००३-०४ | ५५०५१० | | २९०१० | |
| २००४-०५ | १२१८४७५ | | १०१६७७ | |
| २००५-०६ | ८८१३८४ | | ६४६९४ | |
| २००६-०७ | १२४२८४३ | | ४३०३० | |